महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटय स्पर्धेच्या नियमावलीत सुधारणा.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र. हौनास्प - ४९१७/प्र. क्र. २३४/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- १) या विभागाचा शासन निर्णय क्र. मनास्प - २००७/प्र.क्र.१६९/सां.का.३, दिनांक २७ जून, २००७

२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सां.का.सं/३४८२, दिनांक २ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना :-

राज्यातील नाटयकलेला उत्तेजन देण्यासाठी, तिचा विकास व अभिवृध्दी होण्यासाठी व मराठी व्यावसायिक रंगभूमीला नवोदित कलाकार दिग्दर्शक, नाटककार मिळवून देण्यासाठी सन १९५४ पासून राज्यात हौशी राज्य नाटय स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. ही नाटय स्पर्धा मराठी, हिंदी, संस्कृत, मराठी संगीत आणि बालनाटय या पाच विभागात आयोजित केली जाते. हौशी मराठी नाटय स्पर्धा प्राथमिक व अंतिम अशा दोन स्तरामध्ये आयोजित केली जाते.

२. संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक २७ जून, २००७ च्या शासन निर्णयान्वये सदर स्पर्धेच्या नियमात सुधारणा करण्यात आली होती.

३. या स्पर्धेच्या सर्व केंद्रावरील सहभागी रंगकर्मीकडून प्रत्येक केंद्रावर प्रथम क्रमांक आणि द्वितीय क्रमांकाच्या नाटकासही अंतिम फेरीत प्रवेश देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत असल्याची बाब, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्याकडून शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

या शासन निर्णयान्वये, संदर्भाधीन दिनांक २७ जून, २००७ च्या शासन निर्णयामधील अ.क्र. २ येथील नियमात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

सध्याचा नियम	सुधारित नियम
प्रत्येक प्रादेशिक केंद्रातून एका प्रथम पारितोषिक प्राप्त नाटकाची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येईल.	हौशी मराठी नाटय स्पर्धेत ज्या केंद्रावर १५ किंवा त्यापेक्षा जास्त नाटके सादर होतील त्या केंद्रावरील प्रथम व व्दितीय नाटकांना अंतिम फेरीत प्रवेश देण्यात येईल.

२. नियमामधील हा बदल सन २०१७-२०१८ या वर्षाच्या स्पर्धेपासून अंमलात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेनुसार आणि त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५६२/२०१७/व्यय-१५, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७११२९१५१५२४८५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Shailesh Tukaram Jadhav

Digitally signed by Shailesh Tukaram Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f28af075ed91b64d12528e9ab00bb144f43fcf33c23ccf14c820b969f8ca273, serialNumber=a90555ec4a073187eb44ee0b1aa93e5c855afff34eedb4b03bb3e0a6cfd6271c, cn=Shailesh Tukaram Jadhav
Date: 2017.11.29 16:21:11 +05'30'

(शैलेश तु. जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई - ३२
३. प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
४. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, एम.जी. रोड, मुंबई ४०० ०३२
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
८. महालेखापाल-१/२, मुंबई/ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता १ / ले.प.) महाराष्ट्र राज्य,
९. वित्त विभाग (कार्यासन क्र. १५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१०.अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
११.निवड नस्ती, सां.का.४.

****